पोआ/११(६)/१४४/(०५)/२०२३

# पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

## आदेश

### फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १४४ अंतर्गत

१. ज्याअर्थी, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या स्थलसिमेत असे आढळून आले आहे की, विध्वंसक/समाजविरोधी घटक निवासी भागात लपून बसू शकतात आणि त्यांच्या व्दारे सार्वजनिक शांतता, मानवी जीवनाला गंभीर धोका आणि त्या कारणास्तव खाजगी/सार्वजनिक मालमत्तेला इजा होण्याची सर्व शक्यता आहे.

२. आणि ज्याअर्थी, भाडेकरूंच्या वेशात दहशतवादी/समाजविरोधी घटकांकडून विध्वंसक कृत्ये,दगंली,भाडणे इत्यादी घडू नयेत म्हणून घरमालक/भाडेकरूंची तपासणी आवश्यक आहे; आणि सदर घटना घडू नये म्हणून त्यासाठी त्वरित कारवाई आवश्यक आहे.

३. त्याअर्थी, मी, डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई तथा कार्यकारी दंडाधिकरी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ (१९७४ चा कायदा II) अन्वये व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबईच्या दिनांक २३/१२/१९५९च्या आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (महा. अधिनियम XXII १९५१) चे १० उपकलम (२) याव्दारे आदेश देतो की, मुंबई पोलीस आयुक्तांच्या अखत्यारीत येणाऱ्या कोणत्याही घराचा/मालमत्तेचा, हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, मुसाफीर खाना हा व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक घरमालक/जागा मालक/व्यक्ती ज्यांनी कोणत्याही व्यक्तीला राहण्यासाठी जागा भाड्याने दिली आहे/सवलत दिली आहे, त्या भाडेकरूचे सर्व तपशील त्वरीत www.mumbaipolice.gov.in/TenantForm?ps_id=0यासिटीझन पोर्टलवर ऑनलाईन कळवावा.

४. जर अशी व्यक्ती परदेशी असेल, तर मालक आणि परदेशी व्यक्ती यांनी त्याचे नाव, राष्ट्रीयत्व,पासपोर्ट तपशील म्हणजे पासपोर्ट क्रमांक, ठिकाण,आणि जारी करण्याची तारीख, वैधता सादर करावी. व्हिसा तपशील म्हणजे व्हिसा क्रमांक, श्रेणी, ठिकाण आणि जारी करण्याची तारीख, वैधता नोंदणीचे ठिकाण आणि शहरात राहण्याचे कारण नमुद करणे आवश्यक आहे.

५. हा आदेश दि. ०९/०९/२०२३ रोजीचे ००.०१ पासून दि. ०७/११/२०२३ रोजीचे २४.०० वाजेपर्यत पूर्वी मागे घेतल्याशिवाय (दोन्ही दिवसांसह) ६० दिवसांच्या कालावधीसाठी लागू राहील.

६. या आदेशाचे उल्लघंन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १८८ अंतर्गत दंडनीय असेल.

७. सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याव्दारे हा आादेश एकतर्फी पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितीसाठी प्रेसव्दारे आणि सर्व पोलीस ठाणे, सर्व स. पो.आ., सर्व पो.उ.आ., महानगरपालिका प्रभाग कार्यालयांच्या सूचना फलकांवर आणि तहसील आणि प्रभाग कार्यालयात प्रती चिकटवून ते प्रसिध्द केले जातील.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ८ सप्टेंबर, २०२३ रोजी दिला आहे




( डॉ. महेश्वर रेड्डी )
पोलीस उप आयुक्त, (अभियान),
तथा कार्यकारी दंडाधिकरी
बृहन्मुंबई

Scanned with CamScanner

XI(6)/144/ (05)/2023

## THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

## ORDER

### (UNDER SECTON 144 OF CRIMINAL PROCEDURE CODE-1973)

1. Whereas due to the situation prevailing in the areas under the control of Commissioner of Police, Brihan Mumbai, it is apprehended that subversive/anti-social elements may seek hide outs in the residential areas and there is every likelihood of breach of peace and disturbance of public tranquility with grave danger to human life and injury to private/ public property on that account,

2. And whereas it is necessary that some check should be put on landlords/tenants so that terrorist/anti-social elements in the guise of tenants may not cause subversive activities, riots, affray etc: and that immediate action is necessary for the prevention of the same,

3. Now, therefore I, **Dr. Maheswar Reddy, Dy. Commissioner of Police, (Operations),** Greater Mumbai and Executive Magistrate, vide powers conferred upon me u./sec 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974) r/w the Commissioner of Police Brihan Mumbai's Order dated 23/12/1959 u/s 10 sub section (2) of the Maharashtra Police Act, 1951 (Mah. Act XXII of 1951) do hereby order that each landlord/owner/persons dealing in property business of any house/property, Hotel, Lodge, Guest house, Musafir Khana which falls under the jurisdiction of Mumbai Police Commissioner who has let/sub-let/rent out any accommodation to any person, shall immediately furnish the particulars of the said tenant/tenants online on the citizen portal on www.mumbaipolice.gov.in/TenantForm?ps_id=0

4. If the person to whom the accommodation is let/sub-let/rented out is a Foreigner, then the owner and the Foreigner, shall furnish his Name, Nationality, Passport details ie, Passport No., Place and date of issue, validity, Visa details i.e. Visa No., category, place and date of issue, validity, registration place and reason for stay in city.

5. This order shall come into force with effect **00.01 hrs of 09/09/2023 till 24.00 hrs of 07/11/2023 for the period of 60 days** (both days inclusive) unless withdrawn earlier.

6. Any person contravening this order shall be punishable under section 188 of the Indian Penal Code, 1860

7. **As the notice cannot be served individually on all concerned, the order is hereby passed ex-parte. It shall be published for the information of public, through press, and by affixing copies on the Notice Boards of the police stations, Divisional ACsP, Zonal DCsP, Municipal Ward offices, and by affixing copies at Tahsil and Ward offices.**

Given under my hand and seal this on 8th day of the September **, 2023.**

Commissioner of Police (Operations) Brihan Mumbai

**(Dr. Maheswar Reddy)**
Dy. Commissioner of Police (Operations)
and Executive Magistrate.
Greater Mumbai.

Scanned with CamScanner